IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380

ISSN 2319-4766

SRJIS

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-51

## Special Issue of Department of History, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)

5th June 2021











# RECENT TRENDS IN MODERN HISTORY

**Chief Editor**
Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**
Dr. Dipak P. Lonkar
Head, Dept. of History

Book 2

| | | |
|---|---|---|
| 67 | **अचलपूर शहरातील प्रमुख वीरगळ**<br>*डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे* | 323-325 |
| 68 | **राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे, राष्ट्रीय एकात्मतेसंबधी विचार**<br>*प्रा.डॉ.भारत वि.नखाते* | 326-329 |
| 69 | **क्रांतिकारक : वीर बाबुराव शेडमाके**<br>*प्रा. डॉ. डी. एन. कामडी* | 330-333 |
| 70 | **वंचितांचा इतिहास**<br>*डॉ. कल्पना एम. सांगोळे* | 334-338 |
| 71 | **शस्त्रशास्त्र : इतिहास घडवणाऱ्या शस्त्रांच्या इतिहासलेखनाचे शास्त्र**<br>*श्री. मृण्मय दीपक अरबुणे* | 339-341 |
| 72 | **स्वयंभू श्री. हरिश्चंद्र महादेव मंदिराचा इतिहास**<br>*प्रा. डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ* | 342-345 |
| 73 | **स्थानिक इतिहास आणि त्यामधील प्रमुख घटक**<br>*प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील* | 346-348 |
| 74 | **ब्रिटिश कालीन चंद्रपूर नगरपालिकेतील सार्वजनिक शिक्षण सुधारणा**<br>*प्रा. डॉ. प्रमोद ना. घ्यार* | 349-351 |
| 75 | **चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे वैभवशाली पण दुर्लक्षित लोकसाहित्य एक मागोवा**<br>*प्रा. संदीप पुंडलिक नन्नावरे* | 352-356 |
| 76 | **वऱ्हाडातील महानुभाव संप्रदाय: एक सामाजिक [illegible]ती**<br>*डॉ. गजेन्द्र बी. ढवळे* | 357-362 |
| 77 | **कासेगाव येथील प्राचीन शिव मंदिर एक अभ्यास**<br>*डॉ. रविकीरण जाधव & श्री. ज्ञानेश्वर सतिश झरकर* | 363-368 |
| 78 | **सबाल्टर्न लेखनप्रवाह आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत चंद्रपूर जिल्हयातील वंचीतांचे योगदान**<br>*डॉ. पुरुषोत्तम माहोरे* | 369-373 |
| 79 | **विसाव्या शतकातील भारतीय मुस्लीम स्त्रियांची स्थिती**<br>*कु. सानिया सफराजखान पठाण* | 374-378 |
| 80 | **भारतातील स्त्रीयांच्या उन्नतीची चळवळ**<br>*प्रा. कांबळे शिवाजी ईरबा* | 379-383 |
| 81 | **बांग्लादेश संदर्भात इंदिरा गांधी यांचे कर्तृत्व**<br>*प्रा. शिवचरण धांडे* | 384-386 |
| 82 | **सातपुडा पर्वतरांगातील आदिवासींचे सण-उत्सव**<br>*प्रा. डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी* | 387-392 |
| 83 | **स्त्रीवाद**<br>*डॉ. सतिश खरात* | 393-398 |

# वऱ्हाडातील महानुभाव संप्रदाय: एक सामाजिक क्रांती

**डॉ. गजेन्द्र बी. ढवळे**

*इतिहास विभाग प्रमुख, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा, जि. अमरावती*

*Mobil No. 9423623324, gmail- gbdascc@gmail.com*

**प्रस्तावना :**

यादवांच्या राजवटीत स्वास्थ लाभल्यामुळे शुद्र म्हणून उपेक्षिलेला तसेच जनसामान्य समाजही बराचसा सुधारला होता. त्यांची आर्थिक स्थिती जशी सुधारली होती तशीच बौध्दिक व मानसिक स्थितीही सुधारली होती. पण संस्कृत येत नसल्यामुळे व त्रैवर्णिकांचे अधिकार नसल्यामुळे या प्रचंड लोकसमूहाच्या बुध्दीची व मनाची उपासमार चालली होती. शिवाय संस्कृत मध्ये चाललेले तात्विक वादविवाद कोणी पुराणिकाने त्यांच्या कानावर घतलेच तर त्यामुळे त्यांना समाधान वाटण्याऐवजी उलट त्यांच्या मनाचा गोंधळ उडून जाई. निरनिराळे उपासनापंथ आणि भिन्नभिन्न तत्वज्ञानाने आपलाच मार्ग वेदप्रतिपादित आहे असे सांगू लागली म्हणजे या भोळया परंतु श्रध्दाळू जनतेला त्यातला कोणता मार्ग पत्करावा याचा उलगडा करिता येईना. अशी धार्मिक गोंधड निर्माण झाला होता. अशातच ऐलिचपूर येथे राजा दरण्णा हा यादवांचा मांडलीक म्हणून राज्य करीत होता त्यावेळी त्यांना झाडीमंडळाच्या मोहीमेवर असताना या एका सत्पुरूषाची भेट झाली. व ऐलिचपूरच्या महालात घेऊन आले त्यांनी नंतर महानुभाव पंथाची स्थापना केली.

**महानुभाव पंथाचा विस्तार :—** अशा धार्मिक गोधंडाच्या परिस्थितीत हिंसारहित, संगरहित व प्रवृत्तिधर्म—कर्मरहित असा संन्यासमार्गाचा पुरस्कर्ता व भक्तिसांप्रदायी महानुभाव पंथ वऱ्हाडात उत्पन्न झाला.[१] श्रीचक्रधरांनी वऱ्हाडात स्थापण केलेला ऐक विशिष्ट संप्रदाय 'महानुभाव पंथ' या नावाने आजच्या महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. या निरनिराळया प्रांतात, चक्रधराचा हा संप्रदाय वेगवेगळया संज्ञानी संबोधिला जातो. महाराष्ट्र आणि वऱ्हाडात त्याला महानुभाव पंथ म्हणतात. बुंदेलखंडात तो अच्युतपंथ म्हणून प्रशिध्द आहे. तर पंजाबात व अफगाणिस्थानात त्याला जयकृष्णीपंथ असे नाव देण्यात येते. महानुभाव पंथ बाराव्या श्शतकाच्या शेवटी हा एक हिंदुधर्मान्तर्गत संप्रदाय होता. हा वैदिक की अवैदिक हा एक वादग्रस्त प्रश्न असून त्याची उलटसुलट चर्चा आजवर पुष्कळ झाली आहे.[२] तो विषय येथे घेणे योग्य होणार नाही. तो इमादशाही पूर्वकाळात वऱ्हाडात उदयाला आलेला होता तर इमादशाहीच्या काळानंतर त्याचा प्रसार व प्रचार काबूल—कंदाहारपर्यंत झालेला होता. हा पंथ वऱ्हाडातच नव्हे तर संपूर्ण भाारतात महानुभाव पंथ या नावाने परिचित आहे. त्याला अनेक नावाने संबोधल्याचे दिसते. कित्येक ठिकाणी महात्मापंथ या नावानेही प्रशिध्द असल्याचे आढळून येते. अशा चार नावे आहेत. यात भटमार्ग आणि परमार्ग अशा दोन नावांची आणखी भर घातली पाहिजे, कारण, प्रस्तुत पंथाला उद्देशून या दान्ही नावांचा अनेक स्थळी उल्लेख आढळतो म्हणून महानुभाव या पंथाला एकूण साहा नावे आहेत. ती नावे अशी की, महात्मा पंथ, अच्युत पंथ, जयकृष्णी पंथ, भटमार्ग, परमार्ग, महानुभाव या नावाने संप्रदाय ओळखल्या जातो.

महात्मा पंथ हे नाव पडण्याचे कारण असे, की चक्रधराचे अनुयायी एकमेकांना महात्मा या नावाने संबोधीत, व स्वत: चक्रधरही आपल्या शिष्यांना महात्मे म्हणत हे आपल्याला त्यांच्या ग्रंथातून दिसते ते असे, "महात्मेनि प्रियवक्तेया होआवें" यामुळे ज्या पंथात महात्मे आहेत तो महात्मा पंथ अशी कल्पना रूढ झाली असावी.[३] चक्रधराच्या

काळी हा 'परमार्ग' म्हणून धार्मिक संप्रदाय अस्तीत्वात आला. त्या प्रवर्तकाचे नाव चक्रधर होते. त्यांचा शिष्य नागदेवचार्याच्या वेळी त्याला भटमार्ग म्हटल्या जात होते. परंतु नंतर तोच पंथ महानुभाव पंथ किंवा संप्रदाय म्हणून प्रशिद्ध झाला. महानुभाव पथांचे संस्थापक चक्रधर स्वामी होते. त्यांचा पंचकृष्णापैकी हा पाचवा व अखेरचा अवतार होय. श्रीचक्रधरांच्या अवतार धारणाची कथा अपूर्व आहे.[४]

**चक्रधर स्वामींचे पूर्वाआयुष्य व वऱ्हाड प्रांती आगमण :—** चक्रधर स्वामी हे मूळचे गुजराथचे, भरवस म्हणजे आजचे भडोच शशहर होय. येथील मल्लदेव राजाच्या विशाळदेव नामक प्रधानाला एक पुत्र झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव हरिपाळदेव असून त्यांचा मृत्यू आजारपणामूळे वयाच्या सोळाव्या वर्षि झाला.[५] त्याच वेळी द्वारावती येथे श्रीचक्रपाणी नावाच्या ईश्वरावतारी पूरुश होते. कामाख्या ही वऱ्हाडातील एलिचपूर येथे राहत असे.[६] ती हटयोगीनी म्हणून फार प्रसिद्ध होती. ती योग्यांची परीक्षा पाहण्याकरीता म्हणून द्वारावतीस गेली व तीने श्रीचक्रपाणी या योग्यास रतिक्रीडेचा आग्रह केला. त्यांच आदेशाची वाट पाहत तशीच गुहेच्या द्वाराशी सात अहोरात्र उभी राहिली.[७] तीचा हट टाळावा म्हणून योगसामर्थ्याने शशरीरत्याग केला होता. त्याच वेळी मृत हरिपाळाचे शरीर स्मशानात अग्निदाहासाठी आणण्यात आले होते. त्यात चक्रपाणीच्या आत्मा स्वरूपाने हरिपाळदेवाच्या मृत शशरीरात प्रवेश करून नवीन अवतार स्विकारला. त्यामुळे हरिपाळदेवाचे मृत शरीर जिवंत झाले. ही घटना इ. स. १२२१ या वर्षि घडली असे कै. बाळकृष्ण शास्त्री महानुभाव यांचे मत आहे.[८] या अवताराने हरिपाळदेवाने सर्व गृहधर्म स्वीकारले. त्याच्या अंगी गोपाळकृष्णाची भक्ति निर्माण झाली. म्हणून ते शपथ घेतांना तो नहमी गोपाळाचीच शपथ घेत असे. हरिपाळदेवाने द्यूतापायी आपले सर्व द्रव्य हारविले. इतर द्यूतकारांचे जास्तीचे देणे देण्यासाठी आपली पत्नी कमळाइसा हिला तिचे दागिने मागितले. पण ते तिने न दिल्याने संसाराचा त्याग केला.[९] या घटनेनंतर दोन वर्षानी हरिपालदेवांनी नागपूर जिल्हयातील रामटेक येथील श्रीरामाच्या दर्शनाच्या निमित्ताने भडोच सोडलें परंतु पुढे ते रामटेकला न जाता तो एलिचपूर — देऊरवाडा या मार्गाने वऱ्हाडातील रिद्धपूर येथे जाऊन पोहचले.[१०]

महानुभावाचे आद्यगुरु चक्रपाणी गोरखनाथाला भेटले तेव्हा त्यांनी "गोरक्षी आपुलें सामर्थ्य दाऊं आदरिले" होते असे सांगतात. योगसामर्थ्याच्या योगे कलंदराच्या देहात प्रवेश केलेल्या चक्रपाणीची गोरखनाथाने शंभर वर्षे सेवा केली. चांगदेवांचे चक्रपाणीचे शिष्य गुंडम राउड किंवा गोविंदप्रभु आदर्श नाथयोगी असून ते एक सत्पुरुष म्हणून प्रशिद्ध होते.[११] त्यांचे त्याला दर्शन झाले. त्यांच्यापासून त्याने शक्तिस्वीकार केला. त्याचवेळी गोविंदप्रभूंनी हरिपाळदेवाला 'चक्रधर' म्हणून नाव ठेवले व तेच पुढे प्रसिद्ध झाले. त्यावळी भ्रमण करीत प्रथम ते जेव्हा एलिचपूर येथे आले. तेव्हा एका प्रधानाच्या धनाइसा नावाच्या पत्नीला त्यांनी उपदेश दिला होता. त्यावेळी त्यांचा मुक्काम भैरवांच्या मंदिरात होता.[१२] त्यांनी श्रीगोविंदप्रभूपासून शक्तिस्वीकार करून एका दृष्टीने त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. नंतर चक्रधरांनी सुमारे बारा वर्षाचा काळ तेथून जवळच असलेल्या सालबर्डीच्या डोंगरात घालविला. त्यानंतर काही काळ तेलंगणांतील वारंगल या शहरी आले. तेथे काही काळ हंसबा या सुंदर कन्येबरोबर संसार केला.[१३] पुन्हा वैराग्य निर्माण होऊन, पुन्हा सर्वसंघपरीत्याग करून वऱ्हाडात आले.

**राजधानी ऐलिचपूरला आगमन :—** त्यावेळी एलिचपूरचा रामदेवराव दरण्णा हा यादवांचा मांडलीक राजा राज्य करीत होता. त्याला यादव राजाने झाडीमंडळावर स्वारीकरीता पाठविले. तेथें चक्रधर स्वामी एका झाडाखाली मौन धारण करून बसले होते. हा कोणी सत्पुरुष आहे असे पाहून त्यांना आपल्या राहूटीत घेऊन आले. तेथेच राजा दरण्णा व चक्रधर स्वामींची भेट झाली. त्यांना राजधानीत मोठ्या थाटात आणून आपली मुलगी राजकन्या उमादेवीशी विवाह

करून दिला. विवाहनंतर तिचें नाव गौरी ठेवले.[१४] त्यावेळी श्रीचक्रधर स्वमी अंबीनाथाच्या देवळात गरूड घोडयावर स्वार होऊन नियमित दर्शनाला जात असत.

श्रीचक्रधर स्वमीच्या काळात वऱ्हाडात यादवांची सत्ता होती. त्यावेळी शूद्र देवतांच्या भक्तीचे बंड खूप मांजले होते. ते मोडून सर्वसाधारण जनतेला खऱ्या परमेश्वर मार्गाकडे लावण्याची त्यांना आत्यांतिक आवश्यकता वाटली. यासाठी त्यांनी आपल्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा जनतेला उपदेश करण्याला सुरवात केली. त्यांच्या तत्वज्ञानाचा मर्म द्वैतवादाचा आहे. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार अनादि वस्तु असून त्या नित्यच आहेत. अर्थात् त्या परस्परांपासून सर्वस्वी भिन्न आहेत. परमेश्वर हा निराकार निरवयव असून देवता ह्या त्याच्या शक्ति होत. परमेश्वर नित्यमुक्त आहे तर देवता नित्यबद्ध आहेत. त्या मुक्ती देणार कशा? ते देण्याचे सामर्थ्य केवळ नित्यमुक्त परमेश्वराच्याच ठिकाणी आहे. देवता फार झाले तर अनित्य असे क्षणिक सुख देऊ शकतील. [१५] पण जीवानी भक्तीच करायची असल्यास क्षणिक आणि नाशिवंत सुखफळ देण्याऱ्या देवतांची करण्यापेक्षा नित्यमुक्ति देणाऱ्या परमेश्वराची करणे योग्य नाही काय? याच दृष्टीने जीवांनी देवतांची भक्ति करण्यात काही अर्थ नाही, असा श्रीचक्रधरस्वामींचा उपदेश आहे. परमेश्वराच्या आनंदमय स्वरूपात विलीन होणे हाच खरा मोक्ष होय. तो देण्याचे सामर्ध्य केवळ परमेश्वराच्या ठिकाणी असल्यामुळे जींवांनी त्याचीच आराधना करणे आवश्यक होय.

पारकार्थिक दृष्टया आदर्श महानुभाव म्हणजे "नुसते देह: तेही मलीण: रोडके" असे शरीर असलेला. त्याला त्यांनी 'मणूष्यमात्र' अशी संज्ञा दिलेली आहे.[१६] महानुभाव मंहतांने भिक्षान्नाची चव न पाहता मिळालेल्या सर्व पदार्थांचा काला करून खावा त्याची वस्त्रप्रावरणें मळकी फाटकी असावीत. या नियमांच्या बारकाव्यामुळे जैन श्रमणाप्रमाणेच महानुभाव महंतालासुद्धा स्वत:च्या मताने करण्यासारखे असे काही शिल्लक राहत नाही. हा संन्यासमार्ग तलवारीच्या धारेसारखा आहे. याची चक्रधरस्वामीना चांगली जाणिव होती.[१७] भास्करभट्टही ते ओळखून होते. म्हणूनच तो मार्ग सामान्य व्यक्तीला झेपणारा नव्हता. मोक्षप्राप्तीसाठी ईश्वरोपासना करायची, पण ती साकार व सगुण अवताराची करावयाची. कारण अव्यक्त परमेंश्वर काहीच कार्य करू शकत नाही त्यासाठी साकार परमेश्वराला म्हणजे ईश्वरावताराला शरण जाणे हाच एक मार्ग आहे[१८] आतापर्यंत ईश्वराचे अनंत अवतार हाऊन गेले; पण त्यात श्रीदत्तात्रेय, श्रीकृष्णचक्रवर्ती, श्रीचांगदेवराउळ, श्रीगुंडमराउळ श्रीगोविंदप्रभु आणि श्रीचांगदेवराउळ अथवा श्रीचक्रधर हे पाच प्रमुख अवतार होत. यांनाच महानुभावांचे ' पंचकृष्ण' म्हणून संबोधतात. महानुभावीयांच्या प्रार्थनेच्या प्रारंभी———

द्वापरी श्रीकृष्णचक्रवर्ती गोसावियांचे चरण शरण ।।
सैंहाद्री श्रीदत्तात्रेयप्रभु गोसावियांचे चरण शरण ।।
द्वारावतीए श्रीचांगदेवो राउळ सर्वज्ञांचे चरण शरण ।।
ऋद्धिपुरी श्रीगुंडम राउळ गोसावियांचे चरण शरण ।।
प्रतिष्ठानी श्रीचांगदेवो राउळ सर्वज्ञांचे चरण शरण ।।

या शब्दात या पंचकृष्णांना प्रणिपात करण्यात येतो हा पंथ एका दृष्टीने श्रीकृष्णसंप्रदाय आहे तसाच तो श्रीदत्तसंप्रदायहि आहे. हे या पंचकृष्णावरून कळून येईल. महानुभवांच्या प्रार्थनेवरून तिच्या उदात्त तत्त्वांची सहज कल्पना येऊ शकेल जीवाकडून दररोज कळतनकळत कितीतरी पापे होतात. त्यांनी आपण अपवित्र झालो आहोत अशा वास्तव तळमळीने स्वत:च्या शुद्धीसाठी परमेश्वराची प्रार्थना करणे, यावाचून मनाला शांति देणारे दुसरे कोणते साधन आहे. 'यानि कालिच पापानि जन्मान्तरकृतानि मे'। या संस्कृत प्रार्थनेत केवळ जन्मान्तरकृत पापांची क्षमायाचना

आहे. उलट महानुभाव प्रार्थनेत अनादिदोषामुळे, अभिलाषा, अर्हता, ममता, कामक्रोधदिकामुळे जीवस्वरूपावर प्रत्यही चढणाऱ्या अपवित्रतेपासून आपली सुटका व्हावी अशी तळमळ आहे. परमेश्वरच काय तो शुद्धबुद्ध आहे, 'पवित्राचा पवित्र' आणि जीव हा 'सर्व दोषांचें आळें ' ही भक्तीला उपयुक्त असलेली द्वैताची भूमिका या प्रार्थनेत आहे.

**महानुभाव तत्त्वज्ञान :–**

श्रीचक्रधरांनी ज्या तत्वज्ञानाचा पुरस्कार केला त्यांत परमेश्वर, जीव, देवता आणि प्रपंच या चार वस्तुंना प्रमुख स्थान आहे. ही चार मूलतत्वें नित्य आणि अनादि असून परस्परांपासून भिन्न आहेत. त्यांचे एक्य कधी ही संभवत नाही त्यापैकी देवता नित्यबद्ध आहेत.

**जीव–** बंधमुक्त जीव असें जीवाचे लक्षण सांगितलें आहे. माध्वतत्वज्ञानांतहि "स पात्रं बंधमोक्षयी:" असे जीवासंबंधीचे वचन आहे. जीव अनेक, अनंत असून ते अनादी व नित्य आहेत." नित्य: केवळ: अनादि: अविद्यायुक्त वस्तु एकु आति ते जीव शब्दें बोलिजें:"या व्याख्ययेत जीव या पदार्थाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. अनेक गुणदोषांनी युक्त असा हा अव्यक्त, निराकार पण भावरूप जीव सूष्टिरचनेपूर्वी मायास्वरूपातील तमोभागात अनादिकालापासून जडवत् पडून होता. अर्थात तो निष्क्रिय होता. त्याला क्रियादान करण्यासाठी सृष्टीरचनेच्या वेळी मायेने परमेश्वराच्या प्रवृत्तीने त्याला आपल्या स्वरूपाचा एक अंश दिला. हा चैतन्यांश त्या जीवाना मोक्ष मिळेपर्यंत त्याला चिकटून असतो व म्हणून त्याला 'संगग्न' म्हणतात. हा संलग्न त्या जीवाला संतासंत कर्मे करण्याची चेतना देऊन त्याला कार्यप्रवृत्त करतो.

**परमेश्वर–** नित्यमुक्त परमेश्वर असे परमेश्वराचे लक्षण सांगितलेले आहे. हा परमेश्वर माया, ब्रह्म आणि इश्वर या तीन अंशांचा मिळून झालेला आहे. याबाबत " सत् शद्वे ब्रह्म बोलिजे,: चित! शद्वें माया बोलिजे: आनंद शद्वे ईश्वरू बोलिजे: ब्रह्म : माया :ईश्वरू ऐसा यंशु परमेश्वरू एकु आति" ही त्र्यंशु परमेश्वराची कल्पना बऱ्याच फरकोने रामानुजाचार्याच्या तत्वज्ञानांत आढळतात. तेथें चेतनजीव आणि अचेतन प्रकृति ही परमेश्वरांची शरीरे आहेत. पण येथे बह्म, माया आणि ईश्वर मिळून परमेश्वर होतो. परमेश्वरांचे हे तीन अंश सत् चित् आणि आनंद या लक्षणांनी युक्त युक्त आहेत. ही तीन्ही लक्षणे शांकरवेदान्तांत एकाच ब्रह्माची आहेत. हे हे ब्रह्मसर्वश्रेष्ठ निर्गुण निराकार आहे. परंतु महानुभावांनी श्रेष्ठ परमात्म्याचा ते एक अंश आहे असे मानिले आहे त्यांच्या मते परमेश्वर सच्चिदानंदरूप आहे. हे तीन अंश एकापेक्षा दुसरा श्रेष्ठ या क्रमाने आहेत म्हणजे असे की, यांतील चित् म्हणजे माया स्वरूपाला ब्रह्मानेव्यापिले आहे. आणि ब्रह्मस्वरूपाला ईश्वराने व्यापिले आहे यावरून ईश्वरअंश सगळयांत श्रेष्ठ आहे. परंतु हे तीन अंश एकापेक्षा स्वतंत्र आहेत. माया ही श्रेष्ठ देवता आहे. परंतु ती बद्ध आहे. परमेश्वराप्रमाणे ती मुक्त नाही. तसेंच देवता हया स्वतंत्र आहेत. पण त्या परमेश्वराच्या शक्ति आहेत दुसरे असे क ब्रह्म आणि ईश्वर यांच्यांत साम्याप्रमाणे भेदहि आहे.

**देवता:–**देवता हा महानुभावांच्या चार नित्य व स्वतंत्र पदार्थापैकी दुसरा पदार्थ जीवांच्या प्रमाणे या देवताही अनेक आहेत. व त्या सर्वाचे मिळून एक देवताचक्रआहे. ते इतके प्रचंड आहे की चक्रधरांनी म्हटल्याप्रमाणे त्याचे निरूपण करण्यास पुरणार नाही सगळया देवता स्त्रीलिंगी व पुरुष देवतेचा अंतर्भाव होतो. या देवतांचे एक चक्र असून प्रत्येक ब्रह्मांडात एकूण ८१,०१,२५, ०१०, (८१ कोटी, १ लाख, दहा) देवता आहेत. त्या नऊ गटात विभागल्या आहेत.

**प्रपंच:—** या प्रपंचाचे दोन भाग आहेत त्यांपैकीख्कार्यरूप प्रपंच हा अनित्य आहे. कारण संहार काळी हा प्रपंच नाश पावतो. परंतु हया प्रपंचाचा दुसरा भाग जो कारणरूप आहे त्याचा नाश होत नाही. तो नित्य आहे हा प्रपंच कार्यरूप प्रपंचाचा संहारानंतर मायेच्या स्वरूपात असतो.[२०] येथवर श्रीचक्रधरांचे अवतार कार्य, म्हानुभावांचे पंचकृष्ण त्यांचा आचारधर्म आणि तत्वज्ञान यांची थोडक्यात माहिती दिली आहे.

सगुण परमेश्वरावताराच्या उपासनेला महानुभावपंथात अत्यंत श्रेष्ठ स्थान असल्यामुळे या परमेश्वरावताराशी संबद्ध अशा सर्व चराचर वस्तु पवित्र ठरून त्या पूजनीय मानल्या जाणे सहाजिक होते. याच दृष्टीने वरील प्रार्थनेत श्रीचक्रधरांच्या संबंधीस्थानांना दंडवत घातले आहे. "परमेश्वरु भज्य संबंधु वंद्य" असे श्रीचक्रधर स्वामींनी म्हटले आहे; इतकेच नाही तर "एथिचेया संबंधां गेले तेतुले ओटे गोटे आदिकरौनि तुम्हा नमस्करणीये की गा" अशी स्पष्ट आज्ञा चक्रधरांनी आपल्या शिष्यांना दिली. आणि म्हणून इमादशाहीकाळात वऱ्हाडतील अचलपूर, देऊरवाडा रिद्धपूर व ज्या ठिकाणी चक्रधरांनी महाराष्ट्रात भ्रमण केले. ते स्थानपोथीत दर्शविलेल्या ठिकाणी मोठयाप्रमाणात ओटे बांधून महानुभाव पंथीय लोक दंडवत करीत असत असे दिसून येते. या स्थनांना वंदन करणे हा महानुभावीयांच्या प्रार्थनेतील एक महत्त्वाचा भाग असल्याचे दिसते. या पंथात कृतयुगात हेस त्रेतायुगात दत्तात्रय, द्वापारयुगांत श्रीकृष्ण आणि कलियुगात श्रीचक्रधर हे परमेश्वराचे अवतार होत अशी समजूत आहे.[२१] केवळ संबंधी स्थानेच नाहीत तर संबंधी आलेल्या इतर जंगम वस्तुहि त्यांनी नमस्करणीय मानलेल्या आहेत. अशा संबंधी वस्तूंना स्थूलमानाने 'प्रसाद' असे म्हणण्यात येते. या प्रसादाचे नऊ प्रकार आहेत. चक्रधर स्वामी ज्यावेळी वऱ्हाडात आले. तेव्हा येथे जैनांचे प्राबल्य होते. म्हणमन त्यांच्यावर जैन व भागवत धर्माचे संस्कार झाले होते.शिवाय त्यांच्या गुरूपरंपरेत राऊड पंथी चांगदेव व गोविदप्रभु नाथ सिद्ध असल्याने नाथ संप्रदायाचा ठसा दिसून येतो.[२२]

**महानुभाव पंथांचे साहित्य :—** तेराव्या शतकाच्या अखेरीस खालसैयाच्या म्हणजेच मुस्लीमांच्या धाडीत 'लीळाचरित्रा' सारखी मूलभूत ग्रंथाची एकमेव असलेली प्रत नष्ट झाली तो इतिहास प्रसिद्ध आहे. कै. भावे 'कविकाव्यसूची' च्या प्रस्तावनेत म्हणतात. सोळा सतराव्या शतकात "या महानुभाव पंथाला अनेक वैरी असल्यामुळे व त्यांचे ग्रंथ राजमान्य किंवा राष्ट्रमान्य नसल्यामुळे पुष्कळ ग्रंथांचा संहार झाला आहे. महानुभाव लोक म्हणतात की, औरंगजेब बादशहाने एकेवेळी आमच्या ग्रंथांच्या पोथ्या जमवून त्या आपल्या सैन्यातील लोकांस शेगडया व चुली पेटविण्यासाठी दिल्या. [२३] यावरून स्पष्ट दिसून येते की औरंगजेबापर्यत महानुभाव पंथीयांच्या असंख्य पोथ्या व साहित्य मोठया प्रमाणात अस्तित्वात होते.

**नित्कर्ष :** यादवांच्या काळात धार्मिक आंवडबर प्रचंड वाढले होते. सर्व ग्रंथ हे संस्कृतमध्ये असल्यामूळे जनसामान्य जनतेस ते पचनी पडत नसत त्यामूळे अनेक पंथ संप्रदाया निर्माण झाल्यामूळे सामान्य जनतेत धार्मिक गोंधडाची स्थिती निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत चक्रधर स्वामींनी जनसामान्याच्या बोलीभाषेत आपले तत्वज्ञान वऱ्हाडातच नव्हे तर सर्वदूर पसरविले. त्यामूळे आजही महानुभाव संप्रदाय दिसून येतो. म्हाइंमभट, मंहदंबा इत्यादी साहित्यकांनी मोठया प्रमाणात रचना केली. याचा अर्थ असा की, ऐलिचपूरच्या इमादशाहीच्या सर्वच सुलतानांनी महानुभाव साहित्य रचनेवर कोणताही आक्षेप घेतला नाही. कारण उत्तरेतून वऱ्हाडात आलेला औरंगजेब हा त्यांच्या पोथ्यांचा शोध घेतो व जाळतो, त्यांचे स्थानी मशिद उभारतो. तर इमादशाही सुलतान सहिष्णू नसते तर त्यांनी ते ठीकाण केव्हाच पोथ्यांसह नष्ट केले असते परंतु त्यांनी तसे न करता एकप्रकारे प्रोत्साहण असल्याचे दिसते.

**संदर्भ ग्रंथ सुची**

शंकर दामोधर पेंडस, 'महाराष्ट्राचा सांस्कृती इतिहास' नवभारत ग्रंथमाला, कॉग्रेस नगर नागपूर, १९३१,पृ १३९,१४०.
महाराष्ट्र सारस्वत, ५ वी आवृत्ती पृ ५९–६२.
तुळपुळे शं.गो., 'महानुभाव पंथ आणि त्याचे वाडमृय', व्हीनस प्रकाशनः पुणे पृ. ३.
शं गो तुळपुळ., कित्ता पृ ३१.
कोलते विष्णू भिकाजी, 'महानुभाव संशोधन' :१, १९६२, अरुण प्रकाशन, मलकापूर, पृ २.
देशपांडे य. खू., 'एलिचपूर वऱ्हाडची जूनी राजधानी' सावळाराम आणि मंडळी, मुबंई, १९३४, पृ. १०.
देशपांडे य. खू. कित्ता, १९३४, पृ. १४
बाळशास्त्री महानुभाव, महानुभाव पंथ, अमरावती, १९४७, पृ. १२८.
कोलते वि. भि., 'महानुभाव संशोधन' : १ पृ. २.
र. म. भूसारी., 'प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास' मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, १९६५, पृ. १२७.
देशपांडे य.खु., 'श्रीचक्रपाणी चरित्र' यवतमाळ, १९३६, पृ. ४२.
देशपांडे य. खू., 'एलिचपूर वऱ्हाडची जूनी राजधानी', १९३४, पृ, १७.
ह. ना. नेने., 'लीळा चरित्र एकांक',गोविंद सहाय प्रकाशन, नागपूर, १९५४, लीळा १०.
देशपांडे य. खू., 'एलिचपूर वऱ्हाडची जूनी राजधानी', उपरोक्त, १९३४, पृ. २०.
पानसे मुरलीधर गजानन, 'यादवकालीनल महाराष्ट्र', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, १९६३, पृ. १४१.
नेने ह.ना., 'श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ' पृ. ५९.
भवाळकर, नेने ह.ना., 'श्रीसर्वज्ञ चक्रधर निरूपित दृष्टांतपाठ', नागपूर, १९३४, पृ. ९३.
कोलते वि भि., 'उद्धव गीता', अमरावती, १९३५, पृ. ४७.
तुळपुळे शं. गो., 'महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय', उपरोक्त, पृ. ७९.
भूसारी र. म., 'प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास' उपरोक्त, पृ. १४९.
शास्त्री बाळककृष्ण महानुभाव, 'महानुभाव पंथ', अमरावती, १९४७, पृ. २०.
कुलकर्णी अ.रा.,. ग. ह. खरे, खंड पहिला, 'मराठयांचा इतिहास' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती, मंडळासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ७२.
तुळपुळे श. गो., 'महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय', व्हीनस प्रकाशनः, पुणे, पृ. १२०.